




दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA




vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार ११ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २३८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


## भाजपला जिल्ह्यात विकासाचे व्हिजनच नसल्याने ते दिशाहीन

# जिल्ह्याला लागलेला मागासपणाचा कलंक पुसून काढणार-बजरंग बप्पा सोनवणे



**वादळवार्ता/ शिरूरकासार**

जिल्ह्यात भाजपला विकासाचे कोणतेही व्हिजन नसून भाजप दिशाहीन झालेला आहे. मागासलेपणाचा जिल्ह्याला लागलेला कलंक मी पुसून टाकणार असा ठाम विश्वास बीड लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी शिरूर कासार येथे व्यक्त केला


शिरूर कासार येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पार्टीचे युवा प्रदेशाध्यक्ष महेबूबभाई शेख यांच्या वतीने रोजा इफ्तार पार्टीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे, प्रदेश उपाध्यक्ष बबनभाऊ गित्ते, माजी मंत्री बदमराव आबा पंडित, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संदीप भैय्या क्षिरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बजरंग बप्पा सोनवणे हे येथील पत्रकारांशी अनौपचारिक चर्चा करताना म्हणाले की, भाजपने त्यांच्या स्वार्थासाठी ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून बदनाम केले आहे. विकासाचे कोणतेही व्हिजन नसल्याने जिल्ह्यात भाजप आणि त्यांचे उमेदवार आता दिशाहीन झाले आहेत. भाजपने विद्यमान खासदाराचे तिकीट कापणे हे अत्यंत दुर्दैवी आहे भाजपाच्या उमेदवार म्हणतात त्यांचे तिकीट केंद्रीय कमिटीने दिलेले आहे मग त्यांना केंद्रातील नेते निवडून आणणार का असा प्रश्न पडतो कारण राज्यातल्या नेत्यांशी त्यांचे संबंध सर्वश्रुत आहेत असे सांगत त्यांच्या पक्षांतर्गत विरोधावरून टोलाही लगावला

पुढे बजरंग बाप्पा सोनवणे म्हणाले की ऊसतोड कामगारांचा जिल्हा असल्याचा आरोप हा जाणीवपूर्वक करून जिल्ह्याला बदनाम करण्याचे षडयंत्र या भाजपाने केलेले आहे. मी निवडणु आल्या नंतर विविध विकासाचे प्रकल्प आणून जिल्ह्याला लागलेला मागासपणाचा कलंक पुसून टाकीन. विद्यमान खासदाराचे तिकीट नाकारून उमेदवार बदलणे हाच भाजपचा खरा पराभव असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला

यावेळी पंचायत समिती सदस्य पिंटू ठोंबरे, नगरसेवक बालासाहेब जाधव, नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबुराव झिरपे, बी जी मळेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष संतोष जरांगे, नगरसेवक अमोल चव्हाण, सावता कातखडे, भीमराव गायकवाड, नासिरभाई शेख, खदिरभाई शेख, दीपक खोले, सय्यद पठाण, अमजद शेख, सागर गाडेकर, असलम शेख, गणेश मोरे, शिवभूषण जाधव गोकुळ पवार, विनोद पवार भाऊसाहेब डांबे, प्रशांत आगलावे हे उपस्थित होते.

शिरूर कासार येथे मान्यवरांच्या भेटी :- बजरंग बप्पा सोनवणे यांनी युवा प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख यांच्या कार्यालयाला भेट दिली. त्या नंतर नगरसेवक सावता कातखडे, बाबुराव झिरपे, शहराध्यक्ष सागर पाटील, खदिरभाई शेख, सागर केदार यांच्यासह प्रतिष्ठित नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्या.

### सोयगाव परिसरात वादळी वाऱ्यात ज्वारी,मकाचे पीक आडवे
## निंबायती परिसरात आंबा गळाला





**वादळवार्ता/सोयगाव**

सोयगाव सह परिसरात मंगळवारी रात्री वादळी वाऱ्याच्या तडाख्यात कापणी वर आलेल्या उन्हाळी ज्वारीसह मक्याला तडाखा बसून ज्वारी व मका पिकं आडवी झाली आहे तर निंबायती भागात आंब्याच्या कैऱ्या वादळी वाऱ्यात खाली पडून नुकसान झाले आहे


सोयगाव गलवाडा ,रावेरी,कंकराळा,माळेगाव, पिंपरी,जरंडी,निंबायती,रामपुरा तांडा,बहुलखेडा, निंबायतीगाव,कवली, निमखेडी, उमर विहिरे,घोसला आदी भागात वादळी वाऱ्याने जोरदार तडाखा दिला आहे त्यामुळे रब्बीच्या पिकांसह उन्हाळी पिकांची नुकसान झाले आहे त्यामुळे परिसरात शेतकऱ्यांवर संकटामागून संकट येत आहे निसर्गाच्या संकटाची मालिकाच सुरू आहे त्यामुळे शेतकऱ्यांना खरीप पाठोपाठ रब्बी व उन्हाळी हंगामातही नुकसान सहन करावे लागत आहे अद्यापही वादळी वाऱ्यात झालेल्या नुकसानीच्या पंचनामे हाती घेण्यात आलेली नाही...

## सराईत गुन्हेगारा विरोधात स्थानबद्धतेची कारवाई.

**दैनिक वादळ वार्ता**
**नाशिक/सुरेश इंगळे**

उपनगर, नाशिक रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दहशत माजाविणाऱ्या सराईत गुन्हेगारा विरोधात स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. जय उर्फ माऱ्या उर्फ मारुती वाल्मीक घोरपडे( २१ रा. विहितगाव, नाशिक रोड) असे स्थानबद्ध करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे. सराईत गुन्हेगार जय यांच्या विरोधात नाशिक रोड, उपनगर पोलीस ठाण्यात धारदार शास्त्राचा धाक दाखवून दहशत माजविणे ,जबर दुखापत, जबरी चोरी, खरफोडी, प्राणघातक हल्ला, महिलांची छेडछाड, अपहरण, मनाई आदेशाचे उल्लंघन यासारखे ११ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत ,पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशान्वये स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. येत्या काही दिवसात आणखी काही सराईत गुन्हेगारा विरोधात कठोर स्वरूपाची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त सेल्फी विथ सिग्नेचर मतदार जागृती विशेष मोहीम



**वादळवार्ता/बीड**

राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची 133 वी जयंती बीड जिल्ह्यात मोठ्या उत्साहाने साजरी होत असून यानिमित्त मतदारांना जागृती करण्यासाठी 'सेल्फी विथ सिग्नेचर' विशेष मोहीम 39 बीड मतदार संघाच्या जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनातून राबविली जाणार आहे. बीड शहरातील हिरालाल चौक येथे असणाऱ्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी मोठा जनसागर येथे येत असतो. या जनसागरामध्ये सर्वच वयोगटातील नागरिकांचा सहभाग असतो. यामधील मतदार असणाऱ्या वयोगटातील नागरिकांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावण्यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्गदर्शनातून या ठिकाणी स्वीप अंतर्गत 'सेल्फी विथ सिग्नेचर' असा उपक्रम राबविल्या जाणार आहे.



यासह शहरातील विविध 10 'सेल्फी विथ सिग्नेचर' असे फलक असणार आहे. 'सेल्फी विथ सिग्नेचर' करून मतदानाला प्रोत्साहन देण्यासाठी मतदारांनी मोबाईल स्टेटस, डीपी ठेवून जागरूकता करावी तसेच Info beed या फेसबुक पेजवर टॅग ही करावे या उपक्रमात अधिकाधिक मतदारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केले आले आहे.



### राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पुणे जिल्हा
## सरचिटणीसपदी प्रदीप मांगडे

**वादळवार्ता/पुणे**

पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा सरचिटणीसपदी प्रदीप भगवान मांगडे यांची निवड करण्यात आली आहे. नुकतेच पुणेचे जिल्हाध्यक्ष सचिन घोटकुले यांनी याबाबतचे पत्र मांगडे यांना देण्यात आले. यावेळी बारामती तालुकाध्यक्ष संभाजी होळकर, जिल्हा परिषद अध्यक्ष विश्वास देवकाते, बांधकाम व आरोग्य सभापती प्रमोद काकडे, सतिश संकुडे, गौतम काकडे, ॲड नवनाथ भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. अजित दादांनी दिलेल्या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन यापूढे पक्ष वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे मांगडे यांनी सांगितले.

## ३९ बीड मतदार संघातील मतदान यंत्रांचे प्रथमस्तरीय संगणकीकृत सरमिसळ आज झाले

**वादळवार्ता/बीड**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 अनुषंगाने 39 बीड मतदार संघातील मतदान यंत्रांचे प्रथमस्तरीय संगणकीकृत सरमिसळ (१st Randomization) आज झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात प्रथमस्तरीय संगणकीकृत सरमिसळ प्रक्रियेच्या वेळी जिल्हादंडाधिकारी दीपा मुधोळ मुंडे, अपर जिल्हाधिकारी डॉक्टर त्रिगुण कुलकर्णी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे यांच्यासह विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.



या प्रक्रिया अंतर्गत बॅलेट युनिट 5908 कंट्रोल युनिट 3317 व्हीव्हीपॅट मशीन3569चे संगणकीकृत पद्धतीने सरमिसळ केली असून आज झालेल्या प्रथमस्तरीय सरमिसळ मध्ये 2824 बॅलेट युनिट आणि 2824 कंट्रोल युनिट आणि 3059 व्हीव्हीपॅटचे वाटप विधान सभा मतदारसंघांना केले आहे. हे मतदान यंत्र विधानसभा निहाय वाटप करणेकरीता गोदाम उघडण्याची परवानगी व ईव्हीएम मशीन्स विधानसभा निहाय स्थलांतर करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे आज २२८-गेवराई, २२९-माजलगांव, २३०- बीड, २३१-आष्टी, २३२-केज, २३३-परळी विधानसभा मतदार विभागासाठी ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन्सचे प्रथम सळमिसळ (1 Randomization) करण्यात आली आलेली आहे. आता या सरमिसळ (1 Randomization) प्रक्रियेनंतर या ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीन भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे आणि विहित कार्य पद्धतीप्रमाणे योग्य त्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात येणार आहेत.

संपादकीय

# शिक्षक दिनाचे खरे हक्कदार: म.फुले!

क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांची इतर नावे महात्मा फुले, ज्योतिबा फुले, आबा, राष्ट्रपितामह, तात्यासाहेब, शिक्षणसम्राट आदी आहेत. ते मराठी लेखक, कवी, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाज नावाची संस्था स्थापन केली; शेतकरी, कामगार, अस्पृश्य व बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची पेरणी केली. तसेच त्यांनी महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या जयंतीच्या पावन पर्वावर त्यांचे ऋणनिर्देश करणारा श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे यांचा हा लेख अभ्यासा... संपादक.

स्त्री अथवा पुरुष जे शेतकरी अथवा कलाकौशल्य करून पोटे भरण्यात जन्म सार्थक मानतात, परंतु शेतकरी वगैरेंना मदत करणाऱ्यांचा आदरसत्कार करतात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावे, असा महात्मा फुले यांनी मानवास सत्यधर्माचा बोध केला. त्यातील काही वचने आपण वाचली की लक्षात येते, की त्यांचा आवाका किती मोठ्ठा होता? त्यांना अखिल विश्वाला कवेत घेणाऱ्या माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा देणारा धर्म साकार करायचा होता. आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला. सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजाचा आवाज ही भारतात अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ समाजाची किंकाळी होय. वेद हे ईश्वरनिर्मित नसून ते मानवनिर्मित आहेत, असे जोतीरावांचे ठाम मत होते. वेदाने समाजात भेद पडले. म्हणून वेद म्हणजे भेद असे त्यांना वाटे. पोथीतील जातींच्या उत्पत्तीविषयीची कल्पना त्यांना मुळीच मान्य नव्हती. ब्रह्मदेवाच्या मुखातून ब्राह्मण जन्मले, क्षत्रिय बाहुतून जन्मले, शूद्र त्याच्या पायातून निघाले हे विधान त्यांना भयंकर आणि धादांत असत्य वाटे. मनुस्मृती ही शूद्रांच्या बोकांडी गुलामगिरी बसविते म्हणून ती अपवित्र आहे, असे म्हणून त्यांनी मनुस्मृतीचा धिक्कार केला. भ.बुद्धाविषयी जोतिरावांना नितांत आदर वाटे.

शेतकऱ्यांचे आसूड हा त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ होय. तत्कालीन समाजातील जातिभेद अनिष्ट प्रथा, तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरुद्धची प्रतिक्रिया त्यांच्या साहित्यातून उमटलेली होती. त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखविण्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी असल्याचे सर्वमान्य आहे. त्यांनी दिलेल्या शिक्षणाच्या बीजमंत्राने बहुजन समाज खडबडून जागा झाला. त्यांचे ते शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे मंत्र- ओळी सर्वांना तोंडपाठ झाल्या आहेत-

"विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली।
नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले।
वित्ताविना शूद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले।।"

जोतिबा फुलेजींचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. त्याच गावी त्यांचा जन्म दि. ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुलेजींचे वडील आणि दोन चुलते फुले पुरवण्याचे काम करीत होते. त्यामुळे गोरे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले. तेच नाव पुढे रूढ झाले. जोतीरावजी केवळ नऊ महिन्यांचे होते, तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. जोतीबांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी सावित्रीमाईंशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स.१८४२मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लख, त्यामुळे पाच-सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. ग्रामची या प्रसिद्ध तत्ववेत्त्याने महात्मा फुले यांना 'सेंद्रिय बुद्धिवंत' असे संबोधले आहे. जोतीराव करारी वृत्तीचे होते. त्यांस गुरुजनांविषयी व वडीलधाऱ्या माणसांविषयी फार आदर वाटत असे. ते आपला अभ्यास मन लावून करत असत. परीक्षेत त्यांना पहिल्या श्रेणीचे गुण मिळत असत.

# भाजप आमदाराच्या आक्षेपार्थ पोस्टमुळे बीडच्या माजलगाव मध्ये वंचित बहुजन आघाडी आक्रमक

## पोस्टमध्ये चक्क शंभू राजांच नाव हे कुत्र्याला दिल्याने वंचित सह अनेक संघटना आक्रमक

### गुन्हा दाखल करण्यासाठी दिले माजलगाव पोलीस ठाण्यात निवेदन...भाजप आमदाराला पोस्ट भोवणार...

**वादळवार्ता/बीड**

सध्या निवडणुकीचा काळ असल्याने अनेक आमदार खासदार हे बैठका भेटीगाठीसाठी पळत आहेत मात्र यामध्ये आपण काय पोस्ट करतो याचं गांभीर्य देखील नेते मंडळीला असणं गरजेचं आहे काल गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर भाजप आमदारांनी घरी एक श्वान आणलं आणि या श्वानाला चक्क शंभू असं नाव देऊ पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल केली मात्र या पोस्टमुळे आता चांगलाच वाद पेटल्याचा पाहायला मिळतोय या पोस्टमुळे वंचित बहुजन आघाडीसह अनेक संघटना आक्रमक झाले आहे आज भाजप आमदार श्रीकांत भारतीय यांच्यावर बीडच्या माजलगाव मध्ये गुन्हा दाखल करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे आणि लोकसभा उमेदवार अशोक हिंगे यांनी निवेदन दिला आहे. सध्या प्रत्येक गोष्ट सोशल मीडियावर टाकण्याचा एक नवीन गोष्ट पाहायला मिळते सर्वसामान्य व्यक्ती असो की सेलिब्रेटी असो की नेता असो घरातील एखादी गोष्ट




घडली किती सोशल मीडियावर टाकायची आणि व्हावा मिळवायची असं सध्या दिवस आलेले पाहायला मिळतात मात्र या पोस्टमुळे कधी कोणाचे काय मन दुखवतील काही सांगता येत नाही याआधी देखील अनेक कलाकार नेते यांच्या पोस्टमुळे अनेक वाद पाहायला मिळाले मात्र यावेळेस चक्क भाजप आमदारानेच चक्क गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर आपल्या घरात एक श्वान आणलं आणि या श्वानाला चक्क शंभू असं नाव देऊन त्यावर होय शंभूच असं म्हणत ही पोस्ट त्यांच्या फेसबुक पेजवर पोस्ट केली आहे आणि ही सध्या सोशल मीडियावर चांगलाच वादाचा किस्सा ठरत आहे कारण चक्क ज्या छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केलं आणि त्यांच्याच मुलाने हे स्वराज्य टिकून ठेवण्यासाठी कित्येक लढाया लढल्या त्या शंभूराजांचे नाव चक्क श्वानाला हा माणूस देतो अशा अनेक ट्रोल करणाऱ्या कमेंट्स त्या पोस्ट खाली आलेल्या पाहायला मिळतात मात्र यात बीड जिल्ह्यात देखील या पोस्टमुळे संताप व्यक्त केलेला पाहायला मिळतोय यामध्ये सध्या वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील हे माजलगाव दौऱ्यावर असताना अनेक संघटना त्यांना येऊन भेटल्यानंतर हा सगळा प्रकार सांगितल्यानंतर थेट त्यांनी माजलगाव पोलीस ठाणे घाटत भाजप आमदार श्रीकांत भारतीय यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे सध्या या पोस्टमुळे शिवप्रेमी मध्ये आणि अनेक संघटना या या गोष्टीचा निषेध व्यक्त करताना पाहायला मिळतात सध्या वाऱ्यासारखी ही पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत आहे मात्र आता हा गुन्हा दाखल होणार का यावर पक्षश्रेष्ठी आमदार वर कारवाई करणार का हे देखील पाहणे गरजेचे आहे मात्र सध्या तरी या पोस्टमुळे संताप व्यक्त केला जातोय माजलगाव येथे शहर पोलीस स्टेशन येथे निवेदन देताना वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष तथा लोकसभा उमेदवार अशोक हिंगे पाटील, धम्मानंद साळवे सचिन उजगरे, नारायण गोले, अंकुश जाधव, संदिप फुले, डॉ. संजय नाकलगावकर,राजरत्न खळगे, विष्णु शेळके आदी उपस्थित होते.

# नेवासा तालुक्यातील वाकडी येथे मांजरीला वाचविण्याच्या प्रयत्नात विहीरीमधे बुडून पाच जणांचा मृत्यू

अहमदनगर प्रतिनिधी सविस्तर माहिती - नेवासा तालुक्यातील वाकडी येथील गावात विहिरीमधे पडलेल्या मांजर काढण्याच्या प्रयत्नात पाच जणांचा बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना काल घडली असून. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. वाकडी येथील अनिल बापूराव काळे यांच्या घराजवळ वापरत नसलेली 50 फूट खोलीची जुनी विहीर आहे. या विहिरीत गाईंच्या गोठ्यातील शेण-मूत्र सोडले जाते. काल मंगळवार दिनांक 9 एप्रिल रोजी 5 वाजण्याच्या सुमारास पाडव्याच्या दिवशीच विहिरीमध्ये मांजर पडले असता त्या मांजरीला काढण्यासाठी विशाल अनिल काळे (वय 28 वर्षे) हा विहिरीमध्ये उतरला असता विहिरीतील शेण-मूत्र मिश्रित पाण्यामध्ये बुडू लागल्याने त्याचे वडील अनिल बापूराव काळे (वय 55 वर्षे) हे विहिरीत उडी मारली दोघे ही बुडू लागल्याने त्यांना वाचविण्यासाठी माणिक गोविंद काळे (वय 65 वर्षे) हे विहिरीत उतरले, त्यांनतर संदीप माणिक काळे (वय 32 वर्षे) बाबासाहेब गायकवाड (वय 40) असे एकापाठोपाठ पाचजण विरहित उतरले होते. विजय माणिक काळे यांना उपचारासाठी नेवासा नंतर अहमदनगर येथे दाखल करण्यात आले होते.या विहिरीत शेण /मूत्र मिश्रित पाणी तसेच गाळ असल्याने गाळात अडकून पडले व येथेच त्यांचा गुदमरून मृत्यू झाला आहे. सदर घटनेची माहिती मिळताच नेवासा पोलिस स्टेशन चे कर्मचारी तसेच तहसील, व आरोग्य विभाग घटना स्थळी दाखल झाले होते. त्याच बरोबर अहमदनगर, श्रीरामपूर, देवळाली प्रवरा, शिर्डी



येथील महानगरपालिका कर्मचारी व रेस्कुटीम , फायर ब्रिगेड,अँबुलन्स, घटनास्थळी दाखल झाले होते. घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी सिध्दराम सालिमठ , पोलिस अधीक्षक राकेश ओला साहेब,अपर पोलीस अधीक्षक वैभव कलकुर्मे, पोलिस उपविभागीय अधिकारी सुनील पाटीलसाहेब, तहसील संजय बिराजदार, पोलिस निरीक्षक धनंजय जाधव साहेब, अहमदनगर महानगरपालिकेचे मिसाळ साहेब ,संतोष औताडे (पत्रकार/आपदा मित्र प्रशिक्षणार्थी), विठ्ठलराव लंघे, अंकुश काळे, खासदार सदाशिव लोखंडे तसेच विविध रेस्कुटीमचे कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते. शर्थीचे प्रयत्न करत रात्री 1 वाजण्याच्या सुमारास सर्व मृतदेह विहिरीच्या बाहेर काढून नेवासा फाटा येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले होते.


**"प्रसंग"**



पक्षात चालली
ओढाओढी...
घराची करून
फोडाफोडी...
सत्तेमुळे तोडू लागले
नाते...
लोकं अस्वस्थांनी नुसते पाहाते...
कोण निवडून द्यावं प्रश्न पडला लोकांना...
एकमेकांविरुध्द बोलताना अंत नसतो
टोकांना...
घरातलेच एकमेकांविरुध्द बसले लढत...
पहिल्यापासूनच असले प्रसंग घडत...!
---------------
**-महादेव गायकवाड,तंगाईकार.**

# सावरगाव ग्रामपंचायतच्या चुकीच्या नियोजनामुळे ग्रामस्थांचे आरोग्य आले धोक्यात.

माजलगाव( प्रतिनिधी) तालुक्यांतील सावरगाव येथील ग्रामपंचायतच्या चुकीच्या नियोजनामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. येथील गावकऱ्यांनी पंचायत समिती कार्यालय माजलगाव येथे अभिमन्यू जगताप यांनी निवेदनाद्वारे तक्रार दाखल केली आहे. सावरगाव हे साधारणतः चार हजार लोकसंख्या असलेले गाव आहे. सावरगाव अंतर्गत मुख्य रस्ता आहे .या मुख्य रस्त्याच्या एका बाजूला व दुसऱ्या बाजूला हजारो लोक राहतात. मात्र पश्चिम कडून पूर्व दिशेला जाणारे सांड पाणी मुख्य रस्त्या लगत साचले जात आहे. याचे कारण ही तसेच आहे. सावरगाव ग्रामपंचायतनी मुख्य रस्त्या खाली मोठे पाईप न टाकता. ग्रामस्थांच्या राहत्या घराकडे सांड पाणी वळवण्यात आले. यामुळे या सांड पाण्यावर मच्छरांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे लहान मुले तरुण, वयोवृद, लोकांना ताप येण्यासारखे आजार जडत आहेत. सदरील नाला गत 35 वर्षांपासून सुरुळीत सुरु होता.मात्र सावरगाव ग्रामपंचायत नी तो नाला बंद केल्याने नाहक नागरिकांना याचा त्रास भोगावा लागत आहे. या संदर्भात ग्रामसेवक यांना लेखी तक्रार देऊन देखील त्यांच्या कडून कानाडोळा केला जात आहे.या सांड पाण्याची विल्हेवाट न लावल्यास पंचायत समिती समोर आमर उपोषण करण्याचे ईशारा तक्रारदार अभिमन्यू जगताप यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.



# वंचितचे अशोक हिंगे पाटील यांचा गेवराई येथे झंझावाती जनसंपर्क दौरा

# गेवराई तालुक्यातील सर्वच पदाधिकारी कार्यकर्ते मेळाव्याला उपस्थित




**वादळवार्ता/गेवराई**
वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी जनसंपर्क अभियानास सुरुवात केली आहे. आज गेवराई येथे कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला होता. त्यामध्ये गेवराई तालुक्यातील सर्वच वाड्या,वस्ती तांड्यावरील लोक उपस्थित होते. वंचित बहुजन आघाडीचा संदर्भात काल नारायणगडा पासून सुरू झाला आहे ते आज गेवराई पर्यंत पोहोचला आहे. संध्याकाळी माजलगाव येथे देखील मोठी व्यापक कार्यकर्ता बैठक व मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मराठा आरक्षणात गेल्या अनेक वर्षापासून रस्त्यावरची लढाई करणारे अशोक हिंगे पाटील हे कुणबी मराठा असून अँड प्रकाश आंबेडकर यांनी त्यांची बीड लोकसभा उमेदवारी निश्चित केल्यानंतर, सकल मराठा समाजासह बहुजन समाज देखील चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रस्थापित पक्षाचे दोन्हीही उमेदवार हे कारखानदार असून त्यांना जनतेशी काही देणं घेणं आहे, ते फक्त सत्ता प्राप्त करून गर्भ श्रीमंत होत आहेत. यांना या दोन्हीही उमेदवारांना संविधानचे काहीही देणं घेणं नाही. या अशा निष्क्रिय दोन्ही उमेदवारांना जनता डावलून, गरजवंत मराठा उमेदवार अशोक हिंगे यांच्या पाठीशी उभारला आहे. त्याचाच प्रत्यय आज गेवराई येथील कार्यकर्ता मेळाव्याच्या बैठकीत आला. येत्या २१ तारखेला प्रचंड शक्ती प्रदर्शन करत अशोक हिंगे पाटील हे आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी गेवराई मतदार संघातून हजारच्या संख्येने कार्यकर्ते येणार असल्याची माहिती या मेळाव्यात कार्यकर्त्यांनी बोलून दाखवली. बलभीमराव बोराडे यांनी अशोक हिंगे पाटील यांच्या उमेदवारीला पाठिंबा देत गेवराई येथील कार्यक्रम भूमिका मांडली व त्यांनी स्वागत देखील केले आहे. या कार्यक्रमाप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ नेते विष्णू जाधव, विष्णू देवकते, महिला जिल्हाध्यक्ष अँड. अनिता चक्रे, डॉ.छाया हिरवे, पुष्पा तुरुकमाने, सुदेश पोतदार, बालाजी जगतकर, पप्पू गायकवाड, किशोर भोले, संदिप जाधव,पप्पू वडमारे,आदी उपस्थित होते.

# बलभीम नगर, पेठबीड अध्यक्षपदी गोटू वीर सचिवपदी भैयासाहेब मस्के यांची निवड



**वादळवार्ता/बीड**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती 2024 तथागत बुद्ध विहार भिमज्योत क्रिडा मंडळ बलभीम नगर पेठ बीड कार्यकारणी जाहीर अध्यक्षपदी गोटू वीर सचिवपदी भैयासाहेब मस्के यांची निवड दरवर्षी प्रमाणे याही वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जंयती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यासाठी " बलभीम नगर " इदगाह रोड"तथागत बौद्ध विहार भिमज्योत क्रिडामंडळ पेठ बीड ची कार्यकारणी जाहिर करण्यात आली या बैढकीत सुर्वानमते अध्यक्ष पदी पुरुषोत्तम वीर उपाध्यक्ष किरन साबळे, मनोज काकडे, सचिव भैयासाहेब मस्के सहसचिव नागसेन ओव्हाळ कोषअध्यक्ष अनिल डोंगरे राहुल ( भैय्या )काकडे संघटनप्रतिक काकडे, बलराम ( बल्लू ) गुंजाळ,हुसेन शेख नियंत्रक संतोष सोनकाबळे,रवींद्र डोंगरे,सौरभ धनवे,सचिन काकडे, अविनाश काकडे मार्गदर्शक बंडू निसर्गन, कल्याण डोंगरे, लक्ष्मणतात्या मस्के,सुशिल आप्पा काकडे, लक्ष्मण गव्हाणे यांची निवड करण्यात आली या बैढकीस विविध समाज उपयोगी कार्यक्रम घेण्याचा ठराव करण्यात आला यामध्ये रक्तदान शिबिर,रागोळी स्पर्धा,शालेय साहित्य वाटप.आरोग्य शिबिर.आशा विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत मोठ्या प्रमाणात मिरवणूक काडण्यात येणार आहे या बैढकीत भिमज्योत क्रिंडा मंडळ बलभीम नगर पेठ बीड मधील जेष्ठ मंडळी,पुरूष,युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंधरा वर्षांपासून वर्गणी न मागता विड्यात होते भिम जयंती साजरी

वादळवार्ता/विडा
विडा केज तालुक्यातील विडा येथे मागील पंधरा वर्षांपासून भिम जयंती साजरी केली जाते मात्र बाहेरून एक रुपया देखील वर्गणी न मागता स्वखर्चाने जयंती साजरी केली जाते यात राजकीय नेते पुढारी दुकानदार व्यापारी इत्यादी लोकांना वर्गणी न मागता लाखो रुपये समाज बांधव जमा करून विविध प्रकारचे कार्यक्रम साजरे केले जातात यानिमित्त मंगळवारी संध्याकाळी बैठक घेण्यात आली असून यात ना अध्यक्ष ना सचिव सर्वच एकत्रितपणे येऊन कार्यक्रम साजरा करतात भिम जयंतीचा कार्यक्रम २८ एप्रिल रोजी साजरा होणार असून कोणी बाहेर वर्गणी मागत असेल तर विडा येथे संपर्क करावा असे आव्हान विकास वाघमारे अविनाश ढोबळे ,पप्पू सिरसाट सुरज वाघमारे मनोज ढोबळे रोहित जावळे इत्यादीनी केले आहे.

# धर्म-जाती पेक्षा शिक्षणच आयुष्य बदलू शकते-प्रमोद सटाले

## क्लास वन अधिकारी बनलेल्या विद्यार्थ्यांचा शाळेकडून सहृदय सत्कार

**वादळवार्ता/परळी**
धर्म-जातीत अडकून पडण्यापेक्षा शिक्षणच हे आपले आयुष्य बदलू शकते.शाळेचे संस्थापक माजी खासदार कॉ.गंगाधरआप्पा बुरांडे यांची साधी राहणी व उच्च विचारसरणी हे आदर्श शालेय जीवनापासून मनात रुजली असून त्यांचा या गुणाचा माझ्या आयुष्यामध्ये व्यक्तिगतरीत्या खूप मोठा फायदा झाला असल्याचे मत एमपीएससी स्पर्धा परीक्षेतून वित्त व लेखा अधिकारी (वर्ग 1) अधिकारी बनलेल्या प्रमोद सटाले व त्यांची पत्नी स्मिता प्रमोद साटले यांची तालुका वनाधिकारी पदी निवड झाल्याबद्दल आसुबाई माध्य व उच्च माध्य विद्यालय, मांडेखेल शाळेच्यावतीने बुधवारी (दि 10) सहृदय सपत्नीक सत्कार करण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे सचिव एड.अजय बुरांडे, उपाध्यक्ष एड.श्रीधर डिघोळे, संचालक मुरलीधर नागरगोजे, प्राचार्य सुरेश बुरांडे आदीची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना शाळेचे विद्यार्थी असलेले प्रमोद सटाले यांनी सांगितले की,इयत्ता पाचवी मध्येच माझा जो आत्मविश्वास माझ्या शिक्षकाने उंचवला त्याच विश्वासाच्या बळावर मी इथपर्यंत पोहोचू शकलो,स्पर्धा परीक्षांच्या शिक्षणासाठी वडिलांनी प्रसंगी पाच एकर जमीन विकली, सावकाराकडून कर्जही काढले तरी उच्च शिक्षणासाठी



सतत प्रेरणा दिली याचाही अभिमान वाटतो इंग्रजी विषयाचा भीती न बाळगतात त्याची अधिक तयारी करून त्याचा फायदा करून उच्च शिक्षणामध्ये व स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवता येते. शालेय विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर राहावे धर्म आणि जातीपेक्षा केवळ शिक्षणच आपला आयुष्य बदलू शकते अशी भूमिका मांडली.एक अल्पभूधारक शेतकऱ्याचा मुलगा ते वित्त व लेखा अधिकारी या प्रवासामध्ये शाळेचा वाटा खूप मोठा आहे असेही त्यांनी सांगितले तर प्रमोद सटले यांच्या पत्नी स्मिता सटले यांनी शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांनी सोशल मीडिया व मोबाईलच्या अतिरिक्त वापरापासून दूर राहावे असा सल्ला दिला टीव्ही वर्तमानपत्राचा चांगला उपयोग करून आपले जनरल नॉलेज अधिक वृद्धिगत करावा असाही सल्ला दिला किशोरवयीन मुलींना बालविवाहामध्ये गुंतवून त्यांचे शैक्षणिक नुकसान करू नका मुलींवर विश्वास ठेवा व त्यांच्या पंखांना बळ देऊन त्यांना उच्च शिक्षणासाठी प्रेरित करा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष समारोप करतेवेळी संस्थेचे उपाध्यक्ष एड.श्रीधर डिघोळे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास असेल तर ते परदेशातही नोकरी मिळवू शकतात व उच्च पदावर जाऊ शकतात. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे प्राचार्य सुरेश बुरांडे तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज. रा देशमुख तर आभार व्यक्त धनंजय वावळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी शाळेचे सर्वच कर्मचारी व शालेय विद्यार्थी यांनी आपला सहभाग नोंदवला.

# केज नगरपंचायत पुढे शुक्रवारी घंटानाद

**वादळवार्ता/केज**
केज नगरपंचायतचा कारभार इतका ढिसाळ झालाय की येथे प्रशासन नावाची गोष्टच शिल्लक राहिलेली दिसत नाही. मोठा विकास तर दूरच पण नागरिकांना दैनंदिन जीवनात ज्या सहज सुविधा उपलब्ध व्हायला हव्यात त्या उपलब्ध होत नाहीत. केज शहरातील महामार्गावरील पथदिवे गेली पाच वर्षांपासून बंद आहेत. धारूर रोड वरील पथदिवे आजही बंद आहेत तर कळंब रोडचे सुरू असलेले पथदिवे बंद झाले आहेत. जनता गप्प आहे म्हणजे ती समाधानी आहे असा समज होऊ नये. आज शहरात पाणी, स्वच्छता व अनेक छोट्या गल्लीतील रस्ते खेडेगावच्या रस्त्यातून वाईट स्थितीत आहेत. उन्हाळा असल्याने व पाण्याअभावी नाल्या कोरड्या पडल्याने नाल्या काढण्याचे काम आपोआपच थांबले आहे मात्र या तुंबलेल्या व कोरड्या पडलेल्या नाल्यांचा परिणाम जून मध्ये शहराला भोगावा लागण्याची शक्यता आहे. शहरातील रोजा मोहल्ला रस्ता नव्याने बनवणे सुरू आहे. मात्र दोन महिन्यांपासून रस्ता खोदून ठेवलाय. केवळ नगरपंचायतच्या पाईपलाईन काम पूर्ण नसल्याने या रस्त्याचे काम रखडले आहे. विशेष म्हणजे ही पाईपलाईन खोदकाम करण्याचे काम गुत्तेदाराने मोफत करून देण्याचे मान्य करूनही नगरपंचायत हे काम तात्काळ का करत नाही? पाडवा व रमजान सारखे सण साजरे केले जात असताना महामार्गावरील पथदिवे सुरू नसणे किंवा रोजा मोहला रस्ता वेळेत न होणे हे योग्य नाही. याचा लोकांना मोठा त्रास होत आहे. वरील कामे तात्काळ न केल्यास केज विकास संघर्ष समिती येत्या 12 एप्रिल रोजी केज नगरपंचायत समोर सकाळी 11 वाजेपासून बेमुदत घंटानाद आंदोलन करणार आहे. निवेदनाच्या प्रती केजचे तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना देण्यात आल्या आहेत.




# अंतरवली सराटीतील लाठीचार्ज लक्षात ठेवा

## मराठा बांधवांनो मराठा आरक्षण विरोधी उमेदवार पाडा-रोहन गलांडे पाटील

**वादळवार्ता/केज**
बीड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज पहायला गेलो तर लोकसभेचे राजकीय पक्षाचे उमेदवार घोषित केले गेले आहेत व आज घोषीत उमेदवार अहो रात्र दीवस आपल्या प्रचारात मग्न आहेत परंतु मराठा बांधवांना हात जोडून प्रेत्येक मराठा बांधवांच्या चरणी नतमस्तक होऊन आपला एक मराठा बांधव म्हणून सकल मराठा समाज बांधवच्या चरणी नतमस्तक होऊन सांगतो की आपल्या मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाचा लढा उभारल्यावर आपल्या मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांचे अमरण उपोषण सुरू असताना जो लाठीचार्ज झाला त्या आपल्या माता माउलींच्या रक्त सांडले व त्यावेळी सकल महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या डोळ्यात पाणी आले होते त्यांची जान ठेऊन सकल मराठा समाजाने आरक्षणाच्या लढ्यात सत्तेवर बसुन आपल्या समाजाची हानी केली अशा पक्षाचे उमेदवारांना निवडून दिले नाही पाहिजे व आता लोकसभेसाठी रिंगणात उतरलेल्या योग्य उमेदवाराला निवडून द्या व आपन एक मतदार म्हणून आपल्या बीड लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या आपल्या समाज बांधवांस प्राधान्य दिले पाहिजे जो की उद्या मराठा आरक्षणासाठी अहोरात्र मेहनत करून सकल मराठा समाजाला सगेसोयरे कायदाची अंमलबजावणी करण्यात यावी म्हणून कायम मराठा समाजाच्या पाठीशी उभा राहिल अशा मराठा समाज बांधव लोकसभेच्या उमेदवार आहे त्यांच उमेदवारांला प्राधान्य द्यावे योग्य वेळी योग्य चिन्ह समोरील बटन दाबून बीड लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या केज तालुक्यातील मराठा समाज बांधवांला खासदार करावे व जो उमेदवार आजपर्यंत अंतरवली सराटीतील उपोषणावर आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलन तर सोडाच विरोध मात्र सातत्याने केला व मराठा समाज बांधवावर सत्तेचा माज दाखवत गुन्हे दाखल केले अशा मराठा समाज विरोधी उमेदवाराला पाडावे असे मत रोहन गलांडे पाटील यांनी व्यक्त केले गेले आहे.

# अन मांडावरील खेळामुळे रात्री जागू लागल्या ग्रामीण भागातील चित्र

**दैनिक वादळ वार्ताकुडूत्री/सुभाष चौगले**
मार्च, एप्रिल आणि मे महिन्याचे दिवस म्हणजे गावोगावी यात्रा, जत्रा व खेळ यांचे दिवस. सध्या जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात यात्रा, जत्रा व खेळ साजरे होत असल्याने आता त्यानिमित्त सायंकाळी मांड जागवण्यासाठी खेळे मंडळींकडून रात्रभर जागरण सुरू आहे.

जिल्ह्यांतील सर्वच खेड्यांच्या यात्रा एकापाठोपाठ एक होत आहेत. यात्रेच्या पहिल्या दिवशी गावचा 'मांड' जागवण्याचा पारंपरिक रीतीरिवाज असल्याने आता मांड जागरण होत आहे. तर स्थानिक कलाकारांकडून



मनोरंजन आणि करमणूक होणार आहे. काही गावातील मांडावरती स्त्रीप्रधान तमाशा करता येत नसल्याने पुरुषप्रधान तमाशाना काही गावात कार्यक्रमास आमंत्रित केले जाते.यात्रेच्या मुख्यदिवशी गावच्या पाटलांकडून देवाला मानाचा नारळ ठेवल्यानंतर असा तमाशा करणाऱ्यांना परवानगी दिली जाते. एका दिवसाची करमणूक म्हणून व मांड जागवण्याचा रीतीरिवाज आहे.

# महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे शुक्रवारी आष्टी तालुका दौऱ्यावर

## गाव भेटीतून साधणार मतदारांशी संवाद, कॉर्नर सभा ही घेणार



**वादळवार्ता/आष्टी**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि. १२) आष्टी तालुका दौऱ्यावर येत आहेत. तालुक्यात विविध गावात मतदारांच्या भेटी, सुसंवाद साधून कॉर्नर सभा घेणार असल्याची माहिती पक्षाचे आष्टी विधानसभा अध्यक्ष राम खाडे यांनी दिली.

बीड लोकसभेच्या निवडणुकीच्या रणधुमाळी सुरू असून शिवसेना, काँग्रेस, आप या महाविकास आघाडीच्या वतीने महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे शुक्रवारी आष्टी तालुक्यात सकाळी ८ वाजेपासून दौऱ्याला सुरुवात करणार आहेत. त्यानुसार सकाळी ८ वाजता मतदारांच्या मातकुळी येथे कॉर्नर सभा, सकाळी ९ वाजता आष्टा (ह. ना. ) येथे कॉर्नर सभा, सकाळी १० वाजता वाळूज येथे गाव भेट, सकाळी ११ वाजता टाकळसिंग येथे कॉर्नर सभा, सकाळी ११.३० वाजता चिखली येथे गाव भेट, दुपारी १२ वाजता शिराळ येथे गाव भेट, दुपारी १२.३० वाजता चोभा निमगाव येथे कॉर्नर सभा, दुपारी १. ३० वाजता रुई (ना.) येथे गाव भेट, दुपारी २ वाजता पिंपरी घुमरी येथे गाव भेट, दुपारी ३ वाजता घोंगडेवाडी येथे गाव भेट, दुपारी ३.३० वाजता वाहिरा येथे कॉर्नर सभा, दुपारी ४.३० वाजता पारोडी येथे गाव भेट, दुपारी ५ वाजता हातोळण येथे गाव भेट, सायंकाळी ५.३० वाजता ठोबंळ सांगवी येथे गाव भेट, सायंकाळी ६ वाजता सुबेवाडी येथे गाव भेट, सायंकाळी ६.३० वाजता पिंपळा येथे कॉर्नर सभा, रात्री ८ वाजता लोणी (स.) येथे कॉर्नर सभा होणार असून सर्व कॉर्नर सभा या माजी आमदार साहेबराव दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहेत.

या दौऱ्यात बाळासाहेब मिसाळ, परमेश्वर शेळके, काँग्रेसचे रवींद्र ढोबळे, शिवसेनेचे सुभाष राऊत, श्रीराम थोरवे, ऑल इंडिया पँथरचे संदीप जाधव, आम आदमी पार्टीचे डॉ. नाथ, माधव साके, दीपक खिळे, सुभाष वाळके, गंगाआबा आजबे, मीनाक्षी पाडुळे, चंदू घोडके, राजेश पठाडे, राजेश कराड, शशिकांत कव्हेरे, अनिस शेख, फक्कड झांजे, बंकट परकाळे, राज महाराज परकाळे, तात्या सायबर, दादा पाडुळे, प्रताप पाडुळे, सचिन माळशिखरे, बाबा भवर, अजिनाथ अनफट, आबा गिरहे, गणेश शेळके, शिवाजी लोखंडे, सीताराम शिंदे, ईश्वर साके, राजेंद्र म्हस्के, हौसराव जगताप, शैलेश थोरवे, गजेंद्र जरे, गणेश खाडे, स्वप्नील भेटे, डॉ. अशोक सरोदे, भरत जगताप, सुरेश जगताप, सोमीनाथ जगताप, अंबादास खेडेकर, तात्या जेवे, अभिमन्यू जगताप, संजय जोगदंड, शांतीनाथ जोगदंड, कॉ. अजिनाथ ओव्हाळ, नितीन कुमकर, लक्ष्मण जगताप, निलेश जगताप, महेश जगताप, प्रा. गणेश जगताप, संतोष बनकर, गौतम कोकणे, प्रशांत जाधव, नवनाथ आटोळे, सोमीनाथ फौजी, हरी भालेराव, सुदर्शन पाडुळे, गणेश पाडुळे, अमोल औटे, बबन औटे, विजय काळे, वैजिनाथ काळे हे उपस्थित राहणार आहेत. या कॉर्नर सभेसाठी तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आष्टी विधानसभा अध्यक्ष राम खाडे यांनी केले आहे.

# अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथील जिलेटीन स्पोट प्रकरणात चार आरोपी जेरबंद

**दैनिक वादळ वार्ता अंबाजोगाई/परवेज पटेल**

आंबेजोगाई तालुक्यातील व बर्दापूर पोलीस स्टेशन हद्दीतील सोमवारी रात्री झालेल्या स्फोट प्रकरणातील आरोपींना जेरबंद करण्यास बर्दापूर पोलिसांना यश आले असून नेमके कोणत्या कारणाने स्फोट घडून आणला याची सखोल चौकशी सुरू आ हे .

सोमवार दिनांक 8 एप्रिल रोजी आंबेजोगाई तालुक्यातील व बर्दापूर पोलीस स्टेशन हद्दीतील जवळगाव येथे रात्री आठ ते साडेआठच्या दरम्यान अशोक भालेराव यांच्या पानपट्टीत विहीर फोडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जिलेटीनचा वापर करून स्फोट घडून आणला होता यावेळी जवळगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक व बस स्थानक परिसरात एकच गोंधळ उडाला होता हा स्फोट नेमका कशासाठी घडून आणला होता याचा पोलीस तपास करीत असताना आरोपी हे जवळगाव येथिल व जवळगाव शेजारील गावातील असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना बर्दापूर पोलिसांनी अटक केली आहे यातील आरोपी क्रमांक एक हा जवळगाव येथील असून नामे शेख चांद शेख मकसुद रा. जवळगाव वय वर्ष 45 आरोपी क्रमांक दोन हा शेख मोहसीन शेख अहेमद रा. बर्दापूर वय वर्ष 19 आरोपी क्रमांक तीन शेख आनिस शेख सिकंदर रा. भारज वय वर्ष 26 व चौथा आरोपी सचिन रघु शिंदे रा. भारज वय वर्षे 33 यांना अटक करून आरोप निश्चित करण्याची प्रक्रिया व स्फोट कोणत्या पद्धतीने व कशासाठी घडून आणला याची सखोल चौकशी बर्दापूर पोलीस करीत आहेत.

# सावधान ! मांडवा परिसरात बिबट्याचा वावर : ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

**दैनिक वादळ वार्ता अंबाजोगाई/परवेज पटेल**

अंबाजोगाई तालुक्यात एक खळबळजनक घटना समोर आली आहे. शहरापासून जवळ असलेल्या साकुड मांडवा परिसरात बिबट्याचा वावर दिसून आला आहे. या घटनेमुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना होऊन बिबट्याला हुसकावून सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे. या बाबत प्राप्त माहिती अशी की, साकुड मांडवा परिसरात एका शेतकऱ्याला रात्री बिबट्या दिसून आला. त्या शेतकऱ्याने गावातील ग्रामस्थांना याची खबर दिली. गावातील ग्रामस्थांनी तातडीने जमा



लावण्यासाठी पावले उचलली. यात काही जणांनी हलगीही वाजवली. गावातील ग्रामस्थांचा आवाज ऐकून त्या ठिकाणाहून बिबट्यानं पळ काढला, अशी माहिती मिळाली आहे. सतर्कता बाळगण्याचे आवाहन दरम्यान, साकुड - मांडवा परिसरात बिबट्या दिसल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे निर्माण झाले आहे. याबाबत वन अधिकारी कस्तुरे यांच्याशी संपर्क साधला असता परिसरातील ग्रामस्थांनी सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे

# जरंडी चे राहुल पाटील यांची निवड



**वादळवार्ता/सोयगाव**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या(शरद पवार गट) सेवादल प्रदेश संघटक पदी जरंडी ता सोयगाव येथील राहुल यशवंत पाटील यांची बुधवरी नियुक्ती पत्राद्वारे निवड करण्यात आली आहे प्रदेशाध्यक्ष डॉ जानबा म्हस्के यांनी दिलेल्या नियुक्ती पत्रात नमूद आहे की राष्ट्रवादी काँग्रेस सेवादल(शरद पवार गट) संघटनेचे तालुक्यात बळकटीकरण व संघटन उभारणी साठी ही निवड करण्यात आली आहे या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठनेते रंगनाथ काळे,राजेंद्र अहिरे,शहराध्यक्ष रवींद्र काळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष डॉ इंद्रसिंग सोळुंखे, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष राजेंद्र काळे आदींनी अभिनंदन केले आहे.....

# मोखाडा शहरातही पाणी टंचाईला सुरुवात

## ९ विहिरीना टँकरने पाणी पुरवठा,नळातूनही गढूळ पाणी



### पाणी टंचाईचा ग्रामीण रुग्णालया फटका

मोखाडा शहरतीलच एका विहिरीवरून मोखाडा ग्रामीण रुग्णालयाला पाणी पुरवठा होत आहे मात्र त्याच विहिरीतील पाणी साठा कमी झाल्याने त्यानाही पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे अशावेळी आम्हालाही दररोज एक टँकर मिळावा अशी मागणी त्यांनी नगरपंचायतीकडे केली आहे यामुळे ग्रामीण रुग्णालयालाही पाणी टंचाईचा फटका बसला असून एकूणच ग्रामीण असो की शहर तालुक्यात पाणीबाणी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे हे नक्की.

**दैनिक वादळ वार्ता पालघर/सौरभ कामडी**

मोखाडा तालुक्यातील गावापाड्यांनी पाणी टंचाईचा उच्चांक गाठला असतानाच आता मोखाडा शहरातही पाणी टंचाईला सुरावात झाली असून पिण्याच्या पाण्यासाठी आता टँकरच्या पाण्याचा आधार घ्यावा लागत आहे तर एक दिवसाआड वापरावयाच्या पाण्याचा पुरवठा होत असतानाच आता ते पाणीही गढूळ यायला लागल्याने शहर वासीयही आता पाणी टंचाईच्या दृष्ट चक्रात अडकल्याचे दिसून आले आहे यामुळे पाणी टंचाई आणि मोखाडा यांचे नाते काही केल्या संपण्याचे नावं घेत नसल्याचे समोर येत आहे. मोखाडा नगरपंचायत क्षेत्रातील तब्बल ९ विहिरींनी तळ गाठला असून पिण्याच्या पाण्यासाठी फक्त विहिरींवर अवलंबून असलेल्या शहार वासियांना आता टँकरचे पाणी प्यावे लागत आहे यामुळे सर्दी खोकला ताप या आजारांतही वाढ झाल्याचे दिसून येत आहे. मोखाडा नगरपंचायत ही शहर आणि १२ पाड्यांत विभागलेली आहे यामुळे शहरातील दोन ते तीन विहिरींना याशिवाय घोसाळी, माळीपाडा, वारघडपाडा, आंबेपाना, मोरखडक, तेलीपाडा या पाड्याना टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे मोखाडा शहराला नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित आहे मात्र जलशुद्धीकरण यंत्रणा नसल्याने नळाद्वारे येणारे पाणी हे फक्त वापरण्यासाठी वापरले नाते सदरची योजना अतिशय जुनी असल्याने विभाग निहाय एक दिवसाआड पाणी पुरवठा केला जातो अशातच आता या उद्धावाचा पाणीसाठा कमी झाल्याने नळाद्वारे ही गढूळ पाणी यायला सुरवात झाल्याने वापरावयाचे पाणी सुद्धा अशुद्ध यायला लागले आहे यामुळे एप्रिल महिन्यातच अशी परिस्थिती निर्माण झाल्याने मे महिन्यात पाणी टंचाई शिगेला पोहचण्याची भीती व्यक्त असून नागरिकांत चिंता व्यक्त केली जात आहे. एकूणच मोखाडा शहरातील या पाणी टंचाईला कायमस्वरूपी नष्ट करण्यासाठी ३४ कोटींची नवीन पाणी पुरवठा योजना मंजूर होवून त्यांच्या कामालाही सूरवात झाली आहे मात्र सदरचे काम पूर्ण होण्यासाठी किमान अजून वर्ष भराचा अवधी लागणार आहे यामुळे पुढील वर्षीही अशाच पाणी टंचाईचा सामना मोखाडा शहराला करावा लागणार आहे तर मोखाडा गाव पाड्याची स्थितीही अशीच असून जल जीवन मशीन अंतर्गत सुरू असलेल्या कामांना पूर्ण होण्यास अजून वर्ष लागणार आहे त्याच वेळी तिच्या यशस्वीते बद्दल संशय व्यक्त होत आहे यामुळे पाणी टंचाईचे समूळ उच्चाटन होईल का हाच मुळात अनुत्तरीत प्रश्न आहे.

# त्यासाठी शेतकऱ्याच्या पोटी जन्म घ्यायला हवा

## शेतकरीमित्र शब्दावरून बजरंग सोनवणेंनी फटकारले

**बदळवार्ता/बीड**

शेतकरी, कष्टकरी आणि बेरोजगारी यांचे दुःख समजायला शेतकऱ्यांच्या पोटी जन्म घ्यायला पाहिजे ज्यांना शेत आणि शेतकरी काय हे समजले नाही. त्यांना शेतकरी पुत्र आणि मित्र यातील फरक काय हे कसे कळणार ? असा प्रश्न करत बजरंग बप्पा सोनवणे यांनी भाजपच्या उमेदवाराला चांगलेच फटकारले आहे

बीड व शिरूरकासार येथे बैठकांदरम्यान विरोधी उमेदवाराच्या भाषणाचा समाचार घेताना बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले कि ज्याच्या घरात कुणी साधे ग्रामपंचायत सदस्य न्हवते त्या गरीब शेतकरी कुटूंबात मी जन्माला आलो. म्हणून मी शेकतकरी पुत्र आहे आणि याचा मला सार्थ अभिमान आहे. मात्र जे जन्मताच तोंडात सोन्याचा चमचा घेऊन आले त्यांना शेतकऱ्याचे आणि त्याच्या मुला-बाळांचे कष्ट, दुःख, वेदना कसे कळणार ? असा प्रश्न बजरंग बप्पा सोनवणे यांनी भाजपच्या उमेदवाराला केला आहे. तसेच शेतकरी पुत्र नव्हे तर शेतकरी मित्र व्हायला हवे. असे विरोधी उमेदवार करत असलेल्या चर्चेवर सणसणीत चपराक लगावत ते म्हणाले की शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव मिळावा आणि त्याने कष्टाने पिकविलेल्या उसाला रास्त भाव मिळावा म्हणून मी येडेश्वरी साखर कारखाना उभा केला. त्याच्या माध्यमातून आपण मराठवाड्यात



ऊसाला सर्वाधिक भाव दिला आणि बेरोजगारांच्या हाताला काम दिले. म्हणूनच मी शेतकऱ्यांचा खरा मित्र आहे. परंतु ज्यांनी शेतकरी व कामगार यांचे पैसे बुडवून लबाडी केली आणि आपल्या पित्याने उभारलेला साखर कारखाना बंद पाडला. ते शेतकरी आणि बेरोजगारांचे शत्रु आहेत. असा घणाघात त्यांनी केला.

तसेच ज्यांना शेत आणि शेतकरी हेच कळत नाही त्यांना शेतकरी पुत्र कसे कळणार ? ज्या सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला रास्त भाव देण्या ऐवजी निर्यात बंदी करून देशातील शेतकऱ्यांच्या उत्पादित सोयाबीन, कांदा, कापूस या पिकांना रास्त भाव मिळू नये म्हणून बाहेर देशातून माल आयात केला. त्या पक्षाच्या उमेदवाराला शेती आणि शेतकरी याची समज असूच शकत नाही त्यामुळे या निवडणुकीत अशा लोकांना धडा शिकवावा असे आवाहन त्यांनी केले

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रक ग्ु राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )